अहवाल

# माहिती अधिकार दिन

(२८ सप्टेंबर २०२३)

सेठ नरसिंगदास मोर कला आणि वाणिज्य आणि श्रीमती गोदावरीदेवी सराफ विज्ञान महाविद्यालय तुमसर येथे पदवी व पदव्युत्तर राज्यशास्त्र विभागाच्या वतीने 'माहिती अधिकार दिन' साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चेतनकुमार मसराम होते. तर प्रमुख वक्ते म्हणून इंग्रजी विभागप्रमुख डॉ. राधेश्याम दिपटे हे होते. आपल्या अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ. चेतनकुमार मसराम म्हणाले की, आपल्या भारतीय राजकीय व्यवस्थेमध्ये ख-या अर्थाने सुशासन निर्माण करण्यासाठी माहिती अधिकार विषयक जनजागृती होणे ही आजच्या काळाची गरज असल्याचे प्रतिपादन केले. तर प्रमुख वक्ते डॉ. राधेश्याम दिपटे आपल्या मार्गदर्शनात म्हणाले की, भारतीय नागरिकांना आपल्या अधिकार-कर्तव्याची जाणिव करुन देणारा दिवस म्हणजे 'माहिती अधिकार दिन' होय. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा लक्ष्मण पेटकुले (हिंदी विभागाध्यक्ष), प्रास्ताविक डॉ. राजेंद्र बेलोकार, (राज्यशास्त्र विभागप्रमुख) तर आभार प्रा. ज्ञानेश्वर जांभूळे यांनी मानले.

कार्यक्रमाला महाविद्यालयीन प्राध्यापक वृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने झाली.

Principal
Seth Narsingdas Mor College of Arts
& Commerce & Smt.G.D.Saraf Science
College,Tumsar

Right to Information Day : 28.09.2023






Right to Information Day : 28.09.2023




